**कृपया प्रसिद्धीसाठी** **1 एप्रिल, 2009**

## राम नाईक आज (गुरुवार) अर्ज भरणार

**मुंबई, बुधवार :** उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातून भाजपा-शिवसेना युतीतर्फे उमेदवारीचा अर्ज भरण्यासाठी आपल्या पूर्व परंपरेप्रमाणे श्री राम नाईक पहिल्याच दिवशी म्हणजे गुरुवार, 2 एप्रिल, 2009 रोजी सकाळी 11 वाजता मुख्य निवडणूक अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी (बांद्रा पूर्व) यांच्या कार्यालयात उमेदवारीचा अर्ज दाखल करतील.

1978 मध्ये पहिल्यांदा बोरीवलीतून आमदार म्हणून निवडून आल्यानंतर श्री राम नाईक लागोपाठ तीनदा आमदार झाले, तर 1989 मध्ये उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातून खासदार म्हणून निवडून आले. रेल्वे (स्वतंत्र प्रभार), संसदीय कार्य, गृह, योजना आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयांमध्ये राज्यमंत्री म्हणून आणि पेट्रोलियम मंत्री म्हणून चांगले काम करणारे श्री राम नाईक यांनी पुन्हा एकदा उत्तर मुंबईचे लोकसभेत प्रतिनिधित्व करावे म्हणून भाजपा तर्फे त्यांना उमेदवार घोषित करण्यात आले आहे. पुनर्रचित उत्तर मुंबई मतदार संघात बोरीवली, दहिसर, मागाठणे, चारकोप, मालाड पश्चिम आणि कांदिवली पूर्व या सहा विधानसभा असून एकूण 16,06,001 मतदार या निवडणुकीत मतदान करतील.

नामांकन भरण्यासाठी श्री राम नाईक यांच्या सोबत भाजपा-मुंबईचे अध्यक्ष आणि आमदार श्री गोपाळ शेट्टी, शिवसेना नेते श्री. विनोद घोसाळकर, भाजपा-उत्तर मुंबई चे अध्यक्ष श्री. योगेश सागर आणि भाजपा-महाराष्ट्रचे उपाध्यक्ष श्री भाई गिरकर असतील.

**(विनोद शेलार)**
**प्रचार प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**